"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष -२०१५"

**महाराष्ट्र शासन**

Web: http://wrd.maharashtra.gov.in/
क्र. ई-प्रशा-2014/(251/14)/लपा-१

जलसंपदा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई.३२.
दिनांक:- ०१/०६/२०१५

प्रति,

सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

**विषय:- ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील मोड्युल १ ते ५ मध्ये वैयक्तिक माहिती भरण्यासाठी दि. २० जुन २०१५ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत**

संदर्भ:- १) जलसंपदा विभाग शासन निर्णय प्रशा २०१४ /(२५१/१४)/ लपा-१, दिनांक ११/११/२०१४
२) जलसंपदा विभाग शासन पत्र क्र. ई-प्रशा-२०१४/(२५१/१४)/लपा-१, दिनांक २५/०३/२०१५

जलसंपदा विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा विषयक बाबींसाठी "ई-सेवा पुस्तक" ही प्रणाली संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये अनिवार्य करण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ अन्वये या प्रणाली मधील मोड्युल १ ते ५ माहिती भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. सदरील माहिती भरण्याची मुदत दि. 31.05.2015 पर्यत वाढवुन देण्यात आली होती.

तथापि, काही कार्यालयांकडुन सदरील मुदत आणखी वाढवुन देण्याची विनंती करण्यात आली होती. **या अनुषंगाने ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील मोड्युल क्र. १ ते ५ मध्ये जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांची माहिती भरण्यासाठी अंतिम मुदतवाढ दि. २० जुन २०१५ पर्यंत देण्यात येत आहे.**

**या तारखेनंतर पहिले पाच मोड्युलमधील माहिती गोठविण्यात (Freeze) येणार असुन पुढील मोड्युल माहिती भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधितांना विहित कालमर्यादेमध्ये ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील माहिती भरण्याची कार्यवाही पुर्ण करावी.**

डॉ. संजय बेलसरे
उपसचिव (लपा)

प्रतिलिपी:-

१) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीस्तव
२) सर्व DDO यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.